CR1970091922

परिपत्रक
------

क्रमांक कॉन.एक.आर. ३४
पुणे. दि. १२-९-१९७०

(53)

एकत्रीकरण अधिकारी ( सर्व )

विषय : दुरुस्ती एकत्रीकरण योजनेत आढळून आलेल्या शंका तफावती बाबत..

या कार्यालयाकडे आलेल्या दुरुस्ती योजनांचे प्रस्ताव व दुरुस्ती योजनेच्या कागदपत्रांची तपासणी करतांना त्यामध्ये आढळून आलेल्या शंका - तफावती-उणीवा तफावतींची यादी खाली दिलेली आहे.

(१) दुरुस्ती योजनेच्या प्रस्तावा सोबत फक्त अर्जदाराची मंजूर एकत्रीकरण योजनेतील एकत्रीकरण तक्त्यातील खात्याची व नकाशाची नक्कल पाठविली जाते. यापुढे दुरुस्ती योजनांचे प्रस्तावा सोबत अर्जदार व संबंधीत खातेदार यांची खात्यांची एकत्रीकरण तक्त्याची व मुळ मंजूर योजने प्रमाणे व दुरुस्ती प्रमाणे परिस्थिती दाखविणारी टिपा-सह नकाशाची नक्कल पाठवीत जावी.

(२) दुरुस्ती योजना सुचविल्यास ती किती खात्यांत तयार करावी लागणार आहे. त्यामुळे गांवचे एकूण गटांच्या संख्येत किती गटांनी वाढ झाली आहे अगर गट कमी झाले आहेत व त्यामुळे गांवचे टक्केवारीवर काय परिणाम झालेला आहे याबाबत प्रस्तावांत उल्लेख नसतो तरी यापुढे प्रस्तावांत तसा उल्लेख करीत जावा तसेच दुरुस्त योजनेमध्ये जेवढे खातेदार संबंधीत असतील त्या सर्वांची संमती असलेबद्दल निसंदिग्ध शब्दांत स्पष्टीकरण ह देत जावे जेथे कांही लोकांची संमती असेल व कांहींची नसेल तेथे संमती नसलेल्यांच्या बद्दल कारण देत जावे. तसेच मंजूर एकत्रीकरण योजनेच्या संकलीत पत्रकाची नक्कल पाठविली नसते, ती पाठवीत जावी.

(३) सदर गांवची योजना कोणी मंजूर केली आहे व त्याबाबतची मंजूरीची अधिसूचना कोणत्या राजपत्रांत कोणत्या पानांवर प्रसिध्द झालेली आहे याचा उल्लेख प्रस्तावांत केलेला नसतो, तो प्रस्तावांत करीत जावून मंजूर योजनेची अधिसूचना ज्या राजपत्रात प्रसिध्द झाली त्याची नक्कल प्रस्तावा सोबत पाठवीत जावी.

(४) सुचविलेली दुरुस्ती योजना ही आजचे अधिकार अभिलेखास अनुसरुन तयार केलेली आहे अगर कसे याचा उल्लेख प्रस्तावांत नसतो. तसेच सदर गांवचे मंजूर योजनेप्रमाणे नवीन अधिकार अभिलेख लिहून त्याचे प्रख्यापन झाले अगर कसे याचाही उल्लेख नसतो. तरी तो यापुढे करित जावा.

(पान २ पहा)

(५) अर्जदाराच्या मूळ जमिनी कायम ठेवण्यास हरकत नाहीं असे प्रस्ताव या कार्यालयास येतात त्यावेळी संबंधीत खातेदारांना त्याबद्दल अर्जाचे चौकशीचे वेळी समज दिलेली नसते अगर त्यांचे जबाबही घेतलेले नसतात. तरी यापुढे त्यांचे जबाब घेत जावेत व ते प्रस्तावा सोबत अभिप्रायासह पाठवित जावेत.

(६) दुरुस्ती योजना तयार करण्याचे आदेश दिल्यावर दु.योजना प्रसिध्दीस मान्यता मिळण्यासाठी या कार्यालयास येतात. त्यावेळी ज्या खात्यांत दुरुस्ती सुचविली आहे, त्या मंजूर योजनेतील खात्यावर मूळ जबाबावर दुरुस्ती योजने बाबत दाखला ठेवला आहे असा प्रस्तावांत उल्लेख नसतो. तो करित जावा. ही कारवाई इकडून दु.योजना वा मसुदा प्रसिध्दीसाठी मंजूर झाल्यावर करावयाची आहे.

(७) अर्जदाराने अर्जात ज्या तक्रारी मांडलेल्या असतात, त्यांचे मुद्देसुद खंडन करणारे हरकतीपत्रक तयार केलेले नसते. तरी ते तयार करून प्रस्तावा सोबत पाठवीत जावे.

(८) दुरुस्ती योजनेत समाविष्ट होणाऱ्या खात्यांच्या जमिनींची माहिती दाखविणाऱ्या पत्रकांचा नमुना सोबत पाठविलेला आहे. दुरुस्ती योजनेचे प्रस्ताव पाठवितांना -आदेश घेतांना दुरुस्ती योजनेत येणाऱ्या सर्व खात्याबाबतची माहिती सदर पत्रकांत भरून ती प्रस्तावा सोबत पाठवीत जावी.

(९) दुरुस्ती योजने बाबत आतापर्यंत पुरेसा अनुभव आला असल्याने वर नमूद केलेल्या शंका उणीवा तफावती दुरुस्ती योजनांचे प्रस्तावांत रहाणे हे योग्य नाहीं. यावरून दुरुस्ती योजना तयार करतांना - प्रस्ताव पाठवितांना या कार्यालयाकडून वेळोवेळी दिलेल्या सूचनांचा विचार केला जात नाही असे दिसते. तरी यापुढे दुरुस्ती योजनांचे प्रस्ताव पाठवितांना त्यामध्ये या कार्यालयाकडून वेळोवेळी निदर्शनास आणलेल्या शंका, उणीवा तफावती रहाणार नाहींत याची स.प.अ. व प.अ.यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे.

ग. ना. देशपांडे, १८.९.६०

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख म.रा.पुणे करिता.

स्थळ प्रतिवर ज.आ.व सं.भू.अ.
पुणे यांची स्वाक्षरी असे
पु-१७९७०

प्रत : उपसंचालक भू.अ.पुणे, नासिक, नागपूर यांजकडे माहितीसाठी अग्रेषित.
प्रत : कार्यालयातील परिनिरीक्षण लिपिका कडे माहितीसाठी.